विद्यापीठ क्रीडा मंडळ
पुणे विद्यापीठ,गणेशखिंड, पुणे – ७.
जा. क्रं. विक्रीमं/पावि/७१

दिनांक: १६/०३/२०११

मा. प्राचार्य
सर्व संबंधित महाविद्यालये
मा. सचिव, सर्व विभागीय क्रीडा समित्या.....

**विषय: वार्षिक क्रीडा पारितोषिक वितरण समारंभ २०११ – २०१२.....................**

स. न. वि. वि.

विद्यापीठ क्रीडा मंडळाचा शैक्षणिक वर्ष २०११– २०१२ मधील वार्षिक क्रीडा पारितोषिक वितरण समारंभ मंगळवार, दिनांक २७ मार्च, २०१२ रोजी दुपारी ४.०० वा. विद्यापीठ क्रीडा मंडळ कार्यालयाशेजारील क्रीडांगणावर आयोजित करण्यात आलेला आहे. या प्रसंगी विजयी खेळाडूंना पारितोषिके दिली जाणार आहेत. या समारंभाची माहिती संबंधित खेळाडू, प्राध्यापक वर्ग, शारीरिक शिक्षण संचालक व क्रीडा विभागातील संबंधित सेवकांना द्यावी ही विनंती.

या वर्षी पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ क्रमांक १ ते ४ व अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेत क्रमांक १ ते ३ मध्ये विजेत्या सांघिक, वैयक्तिक स्पर्धेतील खेळाडूंना व मा. राज्यपाल महाराष्ट्र राज्य यांचे प्रेरणेने आयोजित १५ वी क्रीडा महोत्सव स्पर्धेत सांघिक, वैयक्तिक क्रमांक १ ते ३ प्राप्त खेळाडूंना विद्यापीठातर्फे भेटवस्तू दिल्या जाणार आहेत. संबंधित संघाचे संघव्यवस्थापक, मार्गदर्शक यांना देखील भेटवस्तू दिल्या जाणार आहेत. सदर वर नमूद विजेत्या खेळाडूंची यादी व संघव्यवस्थापक, मार्गदर्शक यांची यादी दि. १६/०३/२०१२ रोजी आपणांस पाठवलेली आहे. गैरहजर असलेल्या खेळाडू, संघव्यवस्थापक, मार्गदर्शक यांचे पारितोषिकाविषयी विद्यापीठ जबाबदार राहणार नाही.

कृपया सदरच्या यादीप्रमाणे आपल्या महाविद्यालयातील खेळाडू, संघव्यवस्थापक, मार्गदर्शक यांना कळवावे ही विनंती.

वरील समारंभानंतर मा. प्रमुख पाहुणे, मा. कुलगुरू, निमंत्रित, विद्यापीठ क्रीडा मंडळ सदस्य यांच्या समवेत सर्व खेळाडू तसेच मान्यवरांसाठी स्नेह भोजनाचा कार्यक्रम आयोजित केलेला आहे.

**सूचना:** या समारंभास उपस्थित राहण्या प्रित्यर्थ संबंधित खेळाडू, संघव्यवस्थापक, मार्गदर्शक व अधिका–यांना प्रवास व अन्य खर्च विद्यापीठाकडून दिला जात नाही. याची कल्पना संबंधितांना द्यावी ही विनंती. तसेच खेळाडू जवळ महाविद्यालयाचे किंवा संघासोबत जातानाचे विद्यापीठाने दिलेले ओळखपत्र सोबत असणे आवश्यक आहे. दिनांक २७ मार्च, २०१२ रोजी बक्षिस समारंभ संपल्यानंतर खेळाडूंची राहिलेली प्रमाणपत्रे माहे एप्रिलच्या २०१२ पहिल्या आठवडयात दुपारी १२ ते ३ या वेळात घेवून जावीत. (खेळाडू, संघव्यवस्थापक, मार्गदर्शक यांनी या समारंभास उपस्थित राहणे आवश्यक आहे.)

**टीप:** प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धा विजयी संघ व वैयक्तिक विजेते खेळाडू तसेच मार्गदर्शक, संघव्यवस्थापक यांचे फोटो दिनांक २७ मार्च, २०१२ रोजी दुपारी ३.३० वा. विद्यापीठ क्रीडा मंडळ कार्यालयाशेजारील क्रीडांगणावर मा. प्रमुख पाहुणे, मा. कुलगुरू, विद्यापीठ क्रीडा मंडळ सदस्य यांचे समवेत घेतले जाणार आहेत. आपण कृपया संबंधित खेळाडूस दुपारी ३.१५ वा. उपस्थित राहाण्यास सांगावे ही विनंती.धन्यवाद ! सहकार्याची अपेक्षा.

आपला,

संचालक,
विद्यापीठ क्रीडा मंडळ व शा. शि.

## कार्यक्रम पत्रिका

- मा. प्रमुख पाहुण्यांचे आगमन (कुलगुरु कार्यालय) दु. ४.०० वा.
- मा. प्रमुख पाहुण्यांसमवेत क्रीडा मंडळ सदस्य व खेळाडूंचे सामुहिक छायाचित्रण दु.४.३० वा.
- मा. प्रमुख पाहुण्यांचे व्यासपीठावर आगमन
- विद्यापीठ गीत (ध्वनीफित)
- प्रास्ताविक व स्वागत
- अहवाल वाचन व मनोगत
- मा. प्रमुख पाहुण्यांचा परिचय
- मा. प्रमुख पाहुण्यांचे मनोगत
- मा. अध्यक्षांचे भाषण
- आभार प्रदर्शन
- पारितोषिक वितरण समारंभ
- वंदेमातरम् (ध्वनीफित)
- सांस्कृतिक कार्यक्रम व स्नेहभोजन



# पुणे विद्यापीठ

## वार्षिक क्रीडा पारितोषिक वितरण समारंभ

मंगळवार, दि. २७ मार्च २०१२, रोजी दु. ४.३० वा.



# पुणे विद्यापीठ गीत

ज्ञान बनो कर्मशील, कर्म ज्ञानवान

पुण्यमयी दे आम्हा अक्षर वरदान
ज्ञान बनो कर्मशील, कर्म ज्ञानवान

जातिभेद, धर्मभेद, वंशभेद दूर
लाख लाख कंठांतुनि हाच एक सूर
करुणेच्या चरणांशी नत हो विज्ञान

माणुसकी धर्माचा अर्थ जाणतों
श्रमनिष्ठा हे पवित्र तीर्थ मानतों
हृदयांतुनि समतेचा निर्भय अभिमान

सेवेतच मुक्ती ही मंगल दीक्षा
न्यायास्तव जागृति ही सत्त्वपरीक्षा
हे विश्वचि घर अमुचे मंत्र हा महान

मंगेश पाडगांवकर

# पुणे विद्यापीठ क्रीडा मंडळ

## वार्षिक क्रीडा पारितोषिक वितरण समारंभ

सस्नेह नमस्कार,

विद्यापीठातर्फे आंतर विद्यापीठ क्रीडा स्पर्धांमध्ये शैक्षणिक वर्ष २०११-१२ या वर्षी भाग घेतलेल्या विविध संघातील विजयी खेळाडूंचे कौतुक व अभिनंदनार्थ वार्षिक क्रीडा पारितोषिक वितरण समारंभ मंगळवार, दि. २७ मार्च २०१२ रोजी दुपारी ४.३० वा. विद्यापीठ क्रीडा मंडळ कार्यालयाशेजारील क्रीडांगणावर संपन्न होत आहे.

**मा. सौ. अंजली भागवत** (आंतरराष्ट्रीय खेळाडू - नेमबाजी)

व

**मा. सुनील गुदगे** (आंतरराष्ट्रीय खेळाडू - क्रिकेट)

हे प्रमुख पाहुणे असुन

**मा. डॉ. संजय चहांदे** (कुलगुरु, पुणे विद्यापीठ)

हे या समारंभाचे अध्यक्षस्थान भूषविणार आहेत. या कार्यक्रमास आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे.

● आपले नम्र, ●

**डॉ. दीपक माने**
संचालक,
विद्यापीठ क्रीडा मंडळ

**डॉ. माणिक जाधव**
कुलसचिव
पुणे विद्यापीठ, पुणे